पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक १६
**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - १७/०१/२०१४ वेळ – दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १७/०१/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. काळजे नितीन प्रताप

याशिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.थोरात, मा.जुंधारे, – कार्यकारी अभियता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.११) सी.एम.ई.दापोडी नविन मेनगेटसाठी बोलार्ड बसविणेबाबत – मा.वैशाली काळभोर मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) प्रभाग क्र.१५ मधील अंतर्गत रस्त्यांना स्टॉर्म वॉटर पाईपलाईन टाकणेबाबत – मा.किरण मोटे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

--------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.वैशाली काळभोर                                        अनुमोदक – मा.शैलजा शितोळे

शहिद अशोक कामटे यांचे वडील मारुतराव कामटे यांचे तसेच पद्मश्री नामदेव ढसाळ यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत येऊन शुक्रवार दिनांक ०७/०२/२०१४ रोजी स.११.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

**सभापती -** शुक्रवार दिनांक ०७/०२/२०१४ रोजी स.११.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( जवळकर वैशाली राहुल )
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक १६

**<u>सभावृत्तांत</u>**

( दिनांक १७/०१/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - ०७/०२/२०१४ वेळ – सकाळी ११.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १७/०१/२०१४ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०७/०२/२०१४ रोजी सकाळी ११.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. जाधव साधना रामदास
३) मा. प्रशांत शितोळे
४) मा. शितोळे शैलजा बाबुराव
५) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
६) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.गावडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.थोरात, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.चिंचवडे, मा.घोडे – कार्यकारी अभियता, मा.पाटील – प्रशासन अधिकारी (प्रशा.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक २३/१२/२०१३ व ०३/०१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०३/०१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १९६ विषय क्रमांक : १
दिनांक : ०७/०२/२०१४ विभाग – प्रशासन
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४१/२०१३, दि.१६/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.सतिश कुलकर्णी, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/०७/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९७ विषय क्रमांक : २

दिनांक : ०७/०२/२०१४ विभाग – प्रशासन

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४२/२०१३, दि.१६/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.ज्ञानेश्वर ढेरे, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २३/०९/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९८ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०७/०२/२०१४ विभाग – प्रशासन

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०४७/२०१३, दि.०३/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १९९ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०७/०२/२०१४ विभाग – प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/८११/२०१३, दि.२१/०६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.प्रमोद भोसले, मुख्यलेखापाल यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नुसार मुख्यलेखापाल पदावरील नियुक्तीसंदर्भात मे.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन स्टॅम्प क्र. २३३१७/२०१२ पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ विरुध्द महाराष्ट्र शासन व पिं.चिं.मनपा या दाव्यामध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधीन राहून २३/०७/२०१३ पासून पुढे ०१ वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २०० विषय क्रमांक : ५

दिनांक : ०७/०२/२०१४ विभाग – प्रशासन

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५०/२०१३, दि.१३/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर खाली नमुद केलेप्रमाणे -

| अ. क्र. | नांव | पदोन्नतीचे पदनाम | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | डॉ.पाटणेकर राजीव विष्णूपंत | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |
| २ | डॉ.पोटे संजय लक्ष्मण | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला(इ.मा.व) |
| ३ | डॉ.जॉन सुनिल | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |

अधिका-यांना पे बँड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये जेष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता मिळण्यासाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २०१ | विषय क्रमांक : ६

दिनांक : ०७/०२/२०१४ | विभाग – प्रशासन

सुचक : मा.प्रशांत शितोळे | अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५७/२०१३, दि.१७/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.खांडकेकर प्रशांत शरद, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २०२ | विषय क्रमांक : ७

दिनांक : ०७/०२/२०१४ | विभाग : प्रशासन

सुचक : मा.प्रशांत शितोळे | अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२८/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ बाबत.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २०३ | विषय क्रमांक : ८

दिनांक : ०७/०२/२०१४ | विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे | अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२९/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नविन पदांच्या पद निर्मितीबाबत...

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २०४ विषय क्रमांक : ९

दिनांक : ०७/०२/२०१४ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/६/कावि/१/२०१४, दि.२/०१/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जैवविविधता कायद्यान्वये "जैवविविधता" समिती स्थापन करणेसाठी मनपाचे विद्यमान नगरसेवकांमधून ६ सदस्य व १ मनपा प्रशासकीय अधिकारी असे एकूण ७ सदस्यांची समिती स्थापन करावयाची आवश्यकता आहे. सदर ६ नगरसदस्यांपैकी २ जागा महिलांसाठी व २ जागा एस.सी./एस.टी. साठी आरक्षित असून मनपाच्या कायम अस्थापनेवरील १ सदस्य नेमणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत पिं.चिं.म.न.पा. मध्ये वृक्ष प्राधिकरण समिती कार्यान्वित आहे व त्या समितीमध्ये मा.मुख्य उद्यान अधिक्षक हे सदस्य आहेत. जैवविविधता समितीमध्ये मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांची महत्वाची भूमिका असल्याने म.न.पा.तर्फे मा.मुख्य उद्यान अधिक्षक यांचा समितीमध्ये समावेश करणे गरजेचे आहे. ही ७ सदस्यांची समिती स्थापन झाल्यानंतर शहरातील विविध विषयांतील ७ तज्ञ सदस्यांची (उदा.वनस्पती तज्ञ, पक्षी तज्ञ, प्राणी तज्ञ, जलचर तज्ञ, शेती तज्ञ, माती तज्ञ, जैवविविधता तज्ञ इ.) निवड करणे आवश्यक आहे. तदनंतर एकूण १४ सदस्यांची "जैवविविधता" व्यवस्थापन समिती स्थापन करणे शक्य होईल. यामध्ये शहरातील आमदार व खासदार विशेष निमंत्रित असतील. ही समिती पाच वर्षे कालावधीकरीता असते व निवडणूकीनंतर नविन ६ नगरसदस्यांची व १ मनपाचा अधिकारी (मुख्य उद्यान अधिक्षक) यांची समिती स्थापन करण्याची तरतूद असल्याने म.न.पा. क्षेत्रासाठी विद्यमान सदस्यांपैकी ६ सदस्य व १ मनपा प्रशासकीय अधिकारी (मुख्य उद्यान अधिक्षक यांची) जैवविविधता समिती व त्यामध्ये शहरातील विविध विषयांतील ७ तज्ञ सदस्यांची निमंत्रीत तसेच शहरातील ३ आमदार व २ खासदारांची विशेष निमंत्रीत म्हणून निवड करुन पिंपरी चिंचवड शहरासाठी जैवविविधता व्यवस्थापन समिती गठीत करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीने कार्यपत्रिकेवरील विषय क्र.९ नंतर ऐनवेळचे विषय क्र.११ व १२ या प्रमाणे कामकाजाच्या बाबी प्राधान्याने घेण्यात येतील असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : २०५ विषय क्रमांक : ११

दिनांक : ०७/०२/२०१४

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

सी.एम.ई. दापोडी नविन मेनगेटसाठी बोलार्ड बसविणे व विद्युत विषयक व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी येणा-या र.रु.३५,००,०००/- ( अक्षरी र.रु.पस्तीस लाख फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक : २०६ विषय क्रमांक : १२

दिनांक : ०७/०२/२०१४

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.किरण मोटे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

प्रस्तावात नमुद काम अ प्रभाग स्थापत्य मार्फत चालू आहे. सदर कामांतर्गत नमुद केलेल्या ठिकाणी म.न.पा.चा नियोजित ४५.०० मी.रुंदीचा बी.आर.टी.रस्ता आहे. त्यामुळे प्रस्तावात नमुद कामातून सदंर्भिय रस्त्याच्या दक्षिण बाजूच्या पदपथाची दुरुस्ती व नविन पदपथ करता येणे शक्य आहे. मात्र उत्तर दिशेकडील पदपथाची जागा व नव्याने बसवावयाचे रस्ता दुभाजक हे बी.आर.टी.एस. रस्त्याने बाधीत होत असल्याने त्या कामाऐवजी प्रभाग क्र.१४ मधील उर्वरित ठिकाणची दुरुस्ती विषयक कामे करणेबाबत सन्मा.नगरसदस्या सौ.भारती फरांदे तसेच सन्मा.नगरसदस्य श्री.आर.एस.कुमार यांनीही पत्राद्वारे सुचविले आहे. तरी वरीलप्रमाणे प्रस्तावात नमुद रस्त्याच्या दक्षिणेकडील पदपथ व वॉर्डातील उर्वरित ठिकाणची स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

विषय क्रमांक १० चे अभ्यासासाठी मा. विधी समितीची दिनांक ०७/०२/२०१४ ची सभा सोमवार दिनांक १०/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** सोमवार दिनांक १०/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक १६

**<u>सभावृत्तांत</u>**

( दिनांक १७/०१/२०१४ व ०७/०२/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - १०/०२/२०१४ वेळ – दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ०७/०२/२०१४ ची तहकूब सभा सोमवार दिनांक १०/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक : २०७ विषय क्रमांक : १०
दिनांक : १०/०२/२०१४ विभाग – आकाशचिन्ह व परवाना
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आप/०७/कावि/१४/२०१४, दि.८/०१/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह परवाना फी दर निश्चितीबाबत व महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दरातील तफावत विचारात घेऊन परवाना फी मध्ये प्रस्तावासोबतचे परिशिष्ठ अ मध्ये नमूद केलेप्रमाणे दरवाढ प्रस्तावित करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १६३ /२०१४
दिनांक - १३/०२/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.